नियमीत फौ. ख. क्र. ३१/२०१७
सरकार -वि.- देविदास
नि.क्र. ५७.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - दिलीप बालाजी मौदेकर,
वय ६३ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त वन मजुर,
राहणाार – उमरेड ता. उमरेड, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री व्ही.यु.मिरचे यांचे मार्फत**

१. सन २०१६ मध्ये वन परिक्षेत्र अधिकारी खोडनकर यांनी माझ्या समक्ष कार्यवाही केली होती. खोडनकर साहेबांनी मला पांजरेपार येथे फोनकरुन बोलाविले होते. खोडनकर साहेबांना गस्ती दरम्यान काही माणस भेटले. त्या लोकांची विचारपूस केली असता त्यांच्या मोटार सायकलला पिशवी आढळून आली व त्यामधून रक्त येत होते. त्या मोटार सायकलवरील एक व्यक्ती पळून गेला. त्या पिवशीची पाहनी केली असता त्या पिशवी मध्ये चितळ आणि ससा आढळून आले. त्यानंतर त्यांनी जागीच पंचनामा केला व आरोपींना उमरेडला वन विकास महामंडळ कार्यालयात आणले. त्या ठिकाणी जप्त केलेल्या पिशव्या बाहेर काढण्यात आल्या, त्यामध्ये एका चितळाची मुंडकी बाहेर आलेली होती व तिला गोळ्या लागलेल्या होत्या. तसेच एका भागाकडून पायापर्यंत मांस निघालेले होते. त्यांनतर ते सामान जप्त करुन तसा पंचनामा तयार केला. त्यानंतर दोन मोटार सायकल जप्त केल्या व तसा जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर चाकु, सुरी व इतर वस्तू जप्त केल्या व तसा जप्ती पंचनामा तयार केला. त्या ठिकाणी एकूण तीन पंचनामे तयार करण्यात आले. त्या पंचनाम्यामध्ये एक मोक्का पंचनामा, जप्ती पंचनामा व जप्त

केले मांस व मुंडके नष्ट करण्याबाबतचा पंचनामा तयार केला होता. वन अधिकाऱ्यांनी माझे बयान घेतले होते. आता मला मोक्का पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी अनुक्रमांक १ वर सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५८** देण्यात येत आहे. आता मला मृत वन्यप्राण्यांचा मरोणोत्तर पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी अनुक्रमांक १ वर सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५९** देण्यात येत आहे. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी अनुक्रमांक १ वर सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६०** देण्यात येत आहे. माझ्या समक्ष चाकु, सत्तु, कुऱ्हाड व ४ प्लास्टीकच्या बॉटल्स व दोन मोटार सायकल जप्त केल्या होत्या. त्या व्यतीरिक्त काही जप्त केले नाही. जप्त केलेल्या वस्तूंचे फोटो काढल्याचे मला माहीत नाही.

**प्रस्तुत प्रकरणात मुद्देमाल दाखल नसल्यामुळे प्रकरण मुद्देमाल दाखल करण्याकरीता सरकारी अभियोक्ता यांच्या विनंतीवरुन तहकुब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक २१.१२.२०२४

स्वा/-
( एस.जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.